# तदर्थ समिति

क्रमांक : १४९३४/ड-३ (समन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ९ एप्रिल, २०१०.

**:: ज्ञा प न ::**

**विषय :- "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" (Committee on Papers Laid on the Table) या विषयावरील विधानसभा सभागृहाची तदर्थ समिति गठीत करणेबाबत.**

भारतीय संविधान, विधानसभा नियम, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिनियम इत्यादींच्या तरतुदींच्या अनुषंगाने सभागृहात वेगवेगळ्या महामंडळाचे अहवाल सादर केले जातात. तथापि, असे अहवाल सादर करण्यास बराच विलंब होतो. तसेच विधानसभेत विविक्षित असे निदेश देवून काही कागदपत्रे ठेवण्यासंबंधीचे आश्वासने, कपात सूचनेवरील उत्तरे इत्यादी संदर्भातही विलंब होतो.

अशाप्रकारे सभागृहाच्या पटालावर ठेवण्यात येणाऱ्या सर्व कागदपत्रांबाबत तसेच अहवालासंदर्भात होणारा विलंब टाळण्यासाठी, तसेच यासंदर्भात कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब का होतो ? त्याची कारणमीमांसा काय आहे ? ही कारणमीमांसा नियमाप्रमाणे समर्थनीय आहे किंवा कसे ? यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यपद्धतीत कोणते बदल अपेक्षित आहेत ? या कार्यपद्धतीवर योग्य प्रकारे संनियंत्रण कशाप्रकारे ठेवता येईल ? इत्यादी बाबींचे परिनिरीक्षण करुन सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी लोकसभा व राज्यसभेच्या धर्तीवर **"सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" (Committee on Papers Laid on the Table)** या नावाची दिनांक ६ एप्रिल, २०१० रोजी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी खालील सदस्यांची तदर्थ समिति विधानसभा नियम १६३ (१ अन्वये गठीत केली आहे.

...२/-

(१) श्री.मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.
(२) श्री.विलासराव (काका), पाटील, वि.स.स.
(३) श्री.संजय देवतळे, वि.स.स.
(४) श्री.नवाब मलीक, वि.स.स.
(५) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(६) डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.
(७) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(८) श्री.हर्षवर्धन जाधव, वि.स.स.
(९) श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स.
(१०) श्री.बाबासाहेब पाटील, वि.स.स.

मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे या समितीचे समिती प्रमुख राहतील.

मा.संसदीय कार्य मंत्री वा मा.संसदीय कार्य राज्यमंत्री हे या समितीवर विशेष निमंत्रित राहतील.

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय हे या समितीवर निमंत्रित म्हणून राहतील.

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे या समितीचे सदस्य सचिव (Member Secretary) म्हणून काम पाहतील.

**(यु.के.चव्हाण)**
सह सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**<u>याची प्रत</u>** :

(१) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा समिती प्रमुख.
(२) मा.संसदीय कार्य मंत्री.
(३) मा.संसदीय कार्य राज्यमंत्री.
(४) समितीचे सर्व मा.सदस्य.
(५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.
(७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.
(८) महालेखाकार, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा) मुंबई-४०० ०२०.
(९) महालेखाकार, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा) नागपूर.
(१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(११) मंत्रालयीन सर्व विभाग.
(१२) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(१३) व्यवस्थापक, आमदार निवास/मॅजेस्टिक हॉटेल/जुने विधान भवन/मनोरा, मुंबई.
(१४) व्यवस्थापक, आमदार निवास, नागपूर.